0058163

FORM-1A N.C.R.B.

I.I.F.

## पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. 15, वर्ष 2024, दिनांक 09/05/24
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलमे Sections 07
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून 07/05/24 वेळ ........ तारीख पर्यंत 08/05/24 वेळ ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 03/05/2024 वेळ ........
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........ तारीख 09/05/24 वेळ ........
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तर ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. 25 KM
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chauki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव अंबोली पोलीस ठाणे ठिकाणाचे नंबर मुंबई, गल्ली ........ रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण जोगेश्वरी रेल्वे स्टेशन, गाव ........ पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव इलियाज अजीज खान (b) वडिलांचे / पतीचे नाव अजीज खान
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 45 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9821117786
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय केबल ऑपरेटर्स
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion ........ जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता गणेश मस्जीद नगर, घर / नाव नं. 178 फोन / मो. नं. पार्ट [illegible] नं. 02 वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका कफ परेड जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

श्रीमती राजश्री प्रकाश शिंदे, वय 33 वर्षे, अंबोली पोलीस ठाणे, मुंबई

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

Scanned by PDF Scanner

फिर्यादी श्री हालियाज अजीज खान, वय 45 वर्षे, धंदा:- केबल नेटवर्क, रा.ठि. 178, गणेश मारुती नगर, पार्ट नं. 02, कफ परेड, मुंबई 400 005 यांचा स्वतंत्र जबाब स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आला असून तोच प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष,

(मनोज जिरगे)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि. मुंबई.

Scanned by PDF Scanner

फिर्याद दि. ०८/०५/२०२४

श्री. इलियास खान, वय ४४ वर्षे, धंदा– व्यवसाय (केबल नेटवर्कींग ), रा.ठि.– गणेश मारूती नगर, रूम क्र.१७८, पार्ट २, कफ परेड, मुंबई – ४००००५, मो.क्र. ९८२११११७८६

———•———

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर रहावयास आहे. माझा केबल नेटवर्कींग इंटरनेटचा व्यवसाय असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

दिनांक १५/०४/२०२४ रोजी अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम यांनी माझेवर गु.र.क्र.३९५/२०२४ कलम ३८४,३५४, ५०९,५०४,५०६,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला होता. सदर गुन्हयात मला अटक करण्यात आली होती. नंतर मला न्यायालयीन कोठडी मिळाली. मी न्यायालयाच्या आदेशाने सध्या जामीनावर मुक्त आहे. मी जामीन मिळाल्यानंतर अंबोली पोलीस ठाणेचे महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम यांना भेटलो असता त्यांनी मला जामिनबाबतचे बंधपत्र जामीनदारासह पोलीस ठाणे येथे हजर करण्यास सांगितले. पो.उ.नि शिंत्रे यांनी माझेकडे नमुद गुन्हयामध्ये मदत करण्याकरीता सॅमसंग कंपनीचा अे ५५ मॉडेलच्या मोबाईल फोनची मागणी केली.

मला अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम यांना लाच मागणी केलेला मोबाइल देण्याची इच्छा नसल्याने मी दि. ०३/०५/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथील कार्यालयात वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो असता त्यांनी मला पो.नि. मनोज जिरगे यांचे कार्यालयात पाठविले. पो.नि. मनोज जिरगे यांनी मला माझे तक्रारीबाबत अर्ज लिहीण्यास सांगीतला असता मी रीतसर तसा तक्रारी अर्ज मराठीमधे लिहुन दिला.

त्यानंतर पो.नि. जिरगेयांनी मला स.पो.आ. प्रगती अडसुरे मॅडम व तेथे उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. जिरगे यांनी पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक ०३/०५/२०२४ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. जिरगे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. जिरगे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात घेतला.

त्यानंतर पो.नि जिरगे यांनी पंचांसमक्ष अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. त्यानंतर पो.नि. जिरगे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एसडी कार्डमध्ये प्रथम स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि जिरगे, पंच व मी, ला.प्र.वि. कार्यालयात माझी उर्वरीत पोलीस पथकाशी ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पोलीस पथकासह निघून अंबोली पोलीस ठाणेच्या हद्दीतील मिल्लत स्कुल, आक्सा मस्जिद रोड, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई येथे शासकीय वाहनासह थांबलो. पो.नि.जिरगे यांनी पथकातील पोलीस अंमलदार श्री. गायकवाड याचे मार्फतीने माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पडताळणी कारवाईकरीता लोकसेवक यांचे अंबोली पोलीस ठाणे येथील कार्यालयात पंच श्री. लाणेकर यांच्यासह रिक्षाने पाठविले.

मी पंचासह अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम यांचे कार्यालयात गेलो असता शिंत्रे मॅडम या कार्यालयाबाहेर गेले असल्याचे मला समजले. अंबोली पोलीस ठाणेचे शिंत्रे मॅडम या कार्यालयात हजर नसल्याकारणाने व त्यांची भेट न झाल्याने मी पुन्हा शासकीय वाहनाजवळ आलो. पो.नि. जिरगे यांनी अंबोली पोलीस ठाणेचे शिंत्रे मॅडम या कार्यालयात उपस्थित नसल्याने पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करीत असल्याचे मला पंचासमक्ष सांगितले.

Scanned by PDF Scanner

दि. ०६/०५/२०२४ रोजी शिंत्रे मॅडम यांना कोर्ट डयुटी असल्याचे मला चौकशीअंती समजले. त्यामुळे दिनांक ०७/०५/२०२४ रोजी मी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. पो.नि. जिरगे यांनी मला पंचांसमक्ष अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि जिरगे यांनी माझी पडताळणी पथकासोबत ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून अंबोली पोलीस ठाणेच्या हद्दीतील मिल्लत स्कुल, आक्सा मस्जिद रोड, जागेश्वरी पश्चिम, मुंबई येथे शासकीय वाहनासह येवुन थांबलो. त्यानंतर मला पो.नि.जिरगे यांनी अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. वासमवार यांचेसह रिक्षाने पाठविले. अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम या कार्यालयात उपस्थित होत्या. माझे व शिंत्रे मॅडमशी कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर शिंत्रे मॅडम यांनी माझेसोबत असलेले पचं. श्री. वासमवार यांचेबाबत माझेकडे विचारणा केली व त्यांना त्यांचे कार्यालयाच्या बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर शिंत्रे मॅडम यांनी माझेकडे सॅमसंग कंपनीचा अे ५५ मॉडेलच्या मोबाईल फोनची लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी मिल्लत स्कुल, आक्सा मस्जिद रोड, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई परिसरात उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. जिरगे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत पंचांना व मला विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम याने पडताळणी दरम्यान सॅमसंग कंपनीचा अे ५५ मॉडेलच्या मोबाईलची मागणी केली.

पो.नि. जिरगे यांनी अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील महिला पोलीस उप निरीक्षक शिंत्रे मॅडम यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लाचेची मोबाईलची तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळापुर्व/सापळा कारवाई करावयाची असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. जिरगे यांनी माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारा सॅमसंग कंपनीचा अे ५५ मॉडेलच्या मोबाईलची विचारणा केली असता मी त्यांना सदर कंपनीचा मोबाईल घेण्याकरीता माझेकडे रक्कम नसल्याचे सांगितले. मी त्यांना सदर सॅमसंग कंपनीचा अे ५५ मॉडेलचा डमी मोबाईल दुकानातुन घेवुन येतो असे सांगितले असता पो.नि. जिरगे यांनी सहमती दर्शविली. त्यानंतर मी परिसरातील दुकानातुन पांढरा, निळा व लाल रंगाची VAADHMAN NX MENS WEAR असे लिहिलेली कागदी पिशवी त्यामध्ये सिल्वर रंगाचा गिफ्ट कवरमध्ये Samsung Galaxy A 35 5G असे लिहिलेला मोबाईल बॉक्स, बॉक्समध्ये डमी Samsung Galaxy S 23+ मोबाईल घेवुन आलो व पो.नि. जिरगे यांच्या ताब्यात दिला.

त्यानंतर पो.नि. जिरगे यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर सदर पांढरा, निळा व लाल रंगाची VAADHMAN NX MENS WEAR असे लिहिलेली कागदी पिशवी त्यामध्ये सिल्वर रंगाचा गिफ्ट कवरमध्ये Samsung Galaxy A 35 5G असे लिहिलेला मोबाईल बॉक्स, बॉक्समध्ये डमी Samsung Galaxy S 23+ मोबाईलला देखील अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. जिरगे यांनी लोकसेवक यांनी लाचेची मोबाईलची पिशवी स्विकारल्यानंतर मला माझे शर्टाच्या खिशाला लावलेला गॉगल काढुन तो डोळयावर घालावा असा पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर शासकिय वाहनात पंचासमक्ष पांढरा, निळा व लाल रंगाची VAADHMAN NX MENS WEAR असे लिहिलेली कागदी पिशवी त्यामध्ये सिल्वर रंगाचा गिफ्ट कवरमध्ये Samsung Galaxy A 35 5G असे लिहिलेला मोबाईल बॉक्स, बॉक्समध्ये डमी Samsung Galaxy S 23+ मोबाईलला देखील अँथ्रासीन पावडर लावली. त्यानंतर

Scanned by PDF Scanner

पो.नि. जिरगे यांनी पथकातील पोलीस अंमलदार श्री. गायकवाड याचे मार्फतीने माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे अंबोली पोलीस ठाणे येथील कार्यालयात पंच श्री. वासमवार याच्यासह रिक्षाने पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक व पंच काहि अंतर ठेवून होते. मी लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ गेलो असता लोकसेवक पो.उ.नि. शित्रे मॅडम या कार्यालयाबाहेर गेले असल्याबाबत मला समजले. अंबोली पोलीस ठाणेचे शित्रे मॅडम या कार्यालयात हजर नसल्याकारणाने व त्यांची भेट न झाल्याने मी पुन्हा शासकीय वाहनाजवळ आलो. पो.नि. जिरगे यांनी अंबोली पोलीस ठाणेचे शित्रे मॅडम या कार्यालयात उपस्थित नसल्याने पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित केली. पो.नि. जिरगे यांनी माझेकडील पांढरा, निळा व लाल रंगाची VAADHMAN NX MENS WEAR असे लिहिलेली कागदी पिशवी त्यामध्ये सिल्वर रंगाचा गिफ्ट कवरमध्ये Samsung Galaxy A 35 5G असे लिहिलेला मोबाईल बॉक्स, बॉक्समध्ये डमी Samsung Galaxy S 23+ मोबाईल स्वतःच्या ताब्यात घेतला व त्यानंतर पो.नि. जिरगे यांनी मला घरी जाण्यास सांगितले व दि. ०८/०५/२०२४ रोजी ला.प्र.वि कार्यालयात बोलाविले.

पो.नि. जिरगे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दि. ०८/०५/२०२४ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पो.नि जिरगे यांनी आज दि. ०८/०५/२०२४ रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगुन मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. सदर डमी मोबाईल ठेवलेल्या बॉक्सला तसेच कंपनीच्या नावे असलेल्या कागदी पिशवीला देखील अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. जिरगे यांनी लोकसेवक यांनी लाचेची मोबाईलची पिशवी स्विकारल्यानंतर मला माझे शर्टाच्या खिशाला लावलेला गॉगल काढुन तो डोळ्यावर घालावा असा पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि जिरगे, पंच व मी, ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून अंबोली पोलीस ठाणेच्या हद्दीतील मिल्लत ज्युनिअर कॉलेजच्यापुढे असलेल्या एच.पी. पेट्रोल पंपास लागुन असलेल्या कच्च्या रोडवरील मोकळया पॅसेजमध्ये जोगेश्वरी पश्चिम, मुंबई येथे शासकीय वाहनासह थांबलो. पो.नि जिरगे यांनी शासकिय वाहनात पंचासमक्ष त्यांच्या ताब्यात असलेला पांढरा, निळा व लाल रंगाची VAADHMAN NX MENS WEAR असे लिहिलेली प्लास्टीक पिशवी त्यामध्ये सिल्वर रंगाचा गिफ्ट कवरमध्ये Samsung Galaxy A 35 5G असे लिहिलेला मोबाईल बॉक्स, बॉक्समध्ये डमी Samsung Galaxy S 23+ मोबाईल माझे ताब्यात दिला. त्यानंतर पो.नि. जिरगे यांनी पथकातील पोलीस अंमलदार श्री. गायकवाड याचे मार्फतीने माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे अंबोली पोलीस ठाणे येथील कार्यालयात पंचासह मला रिक्षाने पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक हे देखील रिक्षाने अंबोली पोलीस ठाणे येथे आले.

मी अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथील लोकसेवक पो.उ.नि. शित्रे मॅडम यांच्या कार्यालयाजवळ गेलो असता लोकसेवक या त्यांच्या कार्यालयात उपस्थित होत्या. लोकसेवक व माझी कामासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक यांनी माझेकडे मोबाईलची मागणी केली असता मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेला पांढरा, निळा व लाल रंगाची VAADHMAN NX MENS WEAR असे लिहिलेली पिशवी त्यामध्ये सिल्वर रंगाचा गिफ्ट कवरमध्ये Samsung Galaxy A 35 5G असे लिहिलेला मोबाईल बॉक्स, बॉक्समध्ये डमी Samsung Galaxy S 23+ मोबाईल त्यांच्या हातात दिला असता त्यांनी तो स्विकारून त्यांच्या बाजुस असलेल्या टेबलवर ठेवला.

त्यानंतर मी केबीनच्या बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशारीतीने माझे शर्टाच्या खिशाला लावलेला गॉगल काढला व तो माझे डोळयांवर लावुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला त्यावेळी पोलीस पथक हे लोकसेवक यांच्या केबीनमध्ये गेले व त्यांनी लोकसेवक महिला पोलीस उपनिरीक्षक शित्रे यांना ताब्यात घेतले.

Scanned by PDF Scanner

त्यानंतर पोलीस पथकातील अंमलदाराने मला पुन्हा केबीनमध्ये बोलाविले सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्रीमती राजश्री प्रकाश शित्रे असे असल्याचे मला, पंचांना व पोलिस पथकास समजले.

तरी, अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथे कार्यरत असलेले महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती राजश्री प्रकाश शित्रे, यांनी माझेकडे मला जामीन मिळाल्यानंतर जामिनबाबतचे बंधपत्र जामीनदारासह पोलीस ठाणे येथे हजर करण्यास सांगितले व नमुद गुन्हयामध्ये मदत करण्याकरीता माझेकडे सॅमसंग कंपनीचा ए ५५ मॉडेलचा महागडया मोबाईल फोनची मागणी केली व दिनांक ०८/०५/२०२४ रोजी माझेकडुन सॅमसंग कंपनीचा S 23+ मॉडेलचा डमी मोबाईल स्विकारला म्हणुन माझी महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती राजश्री प्रकाश शित्रे, यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथे कार्यरत असलेले महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती राजश्री प्रकाश शित्रे, यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( मनोज जिरगे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned by PDF Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचां तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ......

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

फिर्यादी यांच्यावर आंबोली पो ठाणे मुंबई येथे गु.र.क्र. 395/24, कलम 384, 354, 509, 504, 506, 34 भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यात फिर्यादी यांना मदत करण्यात आली होती. लोकसेवक यांनी फिर्यादी यांना गुन्ह्यामध्ये मदत करणार आहे असे सांगून फिर्यादी यांच्याकडे मुलाखाऊच्या मोबाईलची मागणी केली असल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 07/05/24 रोजीच्या पडताळणीमध्ये लोकसेवक यांना फिर्यादीकडे सॅमसंग कं. मॉडेल क्र. S 55 या मोबाईल फोनची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने दि. 08/05/24 रोजी आंबोली पो.ठा. येथे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडून डमी सॅमसंग कं. मॉडेल क्र. S23+ मोबाईल स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून लोकसेवक यांच्याविरुद्ध कलम - 7 भ्र.प्र. अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक मनोज जिरगे.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)...... Rank...... No...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to...... (3) Transferred to P. S. ...... District...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्यावें पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature] एक प्रत विनामुल्य मिळाली आहे.

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...मनोज जिरगे...

पदनाम Rank पो. निरीक्षक लाप्रवि मुंबई.

तपासिक अं. चा कोड क्र. ......

Posting

Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...09/05/2024...

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by PDF Scanner